# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **30/07/2022**

**Brief of the work done :-**

विनयभंगाच्या गुन्ह्यात दोघांना दोन वर्ष सश्रम कारावास ; महिलांविरुद्धच्या गुन्ह्यात आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यासाठी वाशिम पोलीस दल प्रयत्नशील.

## विनयभंग प्रकरणी दोन आरोपींना दोन वर्ष कारावास

### मुंगळा येथील विनयभंग प्रकरण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगांव** ■ मुंगळा येथील एका महिलेच्या विनयभंग प्रकरणात मालेगाव येथील न्यायालयाने त्याच गावातील दोन आरोपींना दोन वर्षाची सजा व दंडाची शिक्षा सुनावली .

या प्रकरणी आरोपी दामोदर संपत सहस्त्रबुद्धे वय ४५ वर्षे व विलास बद्री पट्टेबहादूर वय ३० वर्षे दोघे रा.मुंगळा तालुका मालेगांव जिल्हा वाशिम यांच्यावर पोलीस स्टेशन मालेगाव येथे दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ४१८ / २०१६ मध्ये भादवि च्या ३५४, २९४, ५०६, ३४ कलमान्वये महिलेच्या विनयभंगाच्या दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांमध्ये मालेगाव पोलिसांनी योग्य तपास करून प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट केले होते. याप्रकरणी दोन्ही आरोपी दोषी आढळून आल्याने प्रथमवर्ग न्यायाधीश मालेगाव यांनी २८ जुलै रोजी दिलेल्या निकालात



वरील दोन्ही आरोपींना दोन वर्षे कारावासासह प्रत्येकी एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास मालेगांव पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलिस उपनिरीक्षक अश्विनी धोंगडे यांनी केल्यानंतर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. पोलीस हेडकॉन्स्टेबल शिरभाऊ यांनी न्यायालयात मालेगाव पोलीस ठाण्यातून पैरवी अधिकारी म्हणून कारभार सांभाळला. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चनसिंग अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली मालेगाव पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांनी या प्रकरणात साक्षीदारांना वेळोवेळी मार्गदर्शन करून या गुन्ह्यात शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केले. (श.प्र.)